
barti
Pursuit for Social Equality
महाराष्ट्र शासन
समता न्याय एकात्मता
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव परिसंवाद
(वर्ष ७५ वे)
२६ जानेवारी २०२५
भारत का संविधान
७६ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
स्थळ: बालगंधर्व रंगमंदिर, शिवाजीनगर,पुणे-४११०३०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत

# ७६ वा प्रजासत्ताक दिन

# व भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवनिमित्त

# विविध कार्यक्रमांचे आयोजन





२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त तसेच भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव (७५वर्षे) निमित्त बार्टी संस्थेच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर येथे रांगोळी या कलेद्वारे भारतीय संविधानाचे महत्व विशद करण्यात आले.
















२५ जानेवारी २०२५ रोजी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे संविधान सन्मान दौड चे आयोजन करण्यात आले होते. या दौडचे उदघाटन केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री मा. ना. रामदासजी आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने स्पर्धक उपस्थित होते..






२५ जानेवारी २०२५ रोजी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे संविधान सन्मान दौड चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

नवराष्ट्र
www.navarashtra.com

**मॅरेथॉन** • ४० देशातील विद्यार्थ्यांसह आठ हजार पुणेकर संविधानाच्या सन्मानसाठी धावले

# ‘संविधान सन्मान दौड’ला पुणेकरांचा प्रतिसाद

पुणे, (वा.) भारतीय संविधान दिन अमृत महोत्सवी वर्षा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था ( BARTI ), संरक्षण व सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा हौशी ॲथलेटीक्स असोसिएशन, संविधान फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित 'संविधान सन्मान दौड 2025 ' या मिनी मॅरेथॉन मध्ये आठ हजार पुणेकरांसह 40 देशातील विद्यार्थ्यांनी सहभागी होत या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुल येथे स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे महासंचालक सुनील वारे, मुख्य आयोजक परशुराम वाडेकर, डॉ. विजय खरे, शैलेश भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानाची उद्देशिका वाचन करण्यात आले. आमदार सिद्धार्थ शिरोळे, रिपाईचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, रजिस्टार ज्योती भाकरे, बार्टीच्या निबंधक इंदिरा अस्वार, पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, मॅरेथॉन संघटनेचे ॲड. अभय छाजेड, राहुल डंबाळे, दीपक म्हस्के, श्याम गायकवाड, संतोष मदने आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले, संविधान ही आमची शान आहे, देशाच्या संविधानाने आम्हाला अंधारातून प्रकाशात आणण्याचे काम केले आहे. संविधानाच्या सन्मानसाठी विद्यार्थी, महिला, परदेशी विद्यार्थी सुद्धा धावले ही बाब कौतुकास्पद आहे. प्रास्ताविक आयोजक परशुराम वाडेकर यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे सचिव दीपक म्हस्के यांनी केले.




## संविधान दौड २०२५मधील विजेत खालीलप्रमाणे

■ दहा किलोमीटर (पुरुष)
प्रथम क्रमांक- अंकुश हक्के
द्वितीय क्रमांक -तुषार बिन्नर
तृतीय क्रमांक- निलेश आरसीकर

■ दहा किलोमीटर (महिला)
प्रथम क्रमांक -साक्षी जाडयाळ
द्वितीय क्रमांक -यामिनी ठाकरे
तृतीय क्रमांक - शीतल तांबे

■ पाच किलोमीटर (पुरुष)
प्रथम क्रमांक -हर्षद कदम
द्वितीय क्रमांक - अनुपमसिंग सिन्हा
तृतीय क्रमांक -गणेश डोंगरे

■ पाच किलोमीटर (महिला)
प्रथम क्रमांक -राणी मुचंडी
द्वितीय क्रमांक -साक्षी बोराडे
तृतीय क्रमांक -प्रियंका ओकसा

■ तीन किलोमीटर (पुरुष)
प्रथम क्रमांक -अजय सिंग
द्वितीय क्रमांक -अभिषेक गुळविले
तृतीय क्रमांक -आदिनाथ साळुंखे

■ तीन किलोमीटर (महिला)
प्रथम क्रमांक -अनुष्का अमरदीप शिंदे
द्वितीय क्रमांक -आदिती धनंजय हरगुडे
तृतीय क्रमांक -आदिती सोमनाथ तांबे

Pune Plus Edition
Jan 28, 2025 Page No. 4
Powered by: Navarashtra.com

लोकनजर
२७-१-२०२५

# संविधान सन्मान दौडला पुणेकरांचा प्रतिसाद

**पुणे :** भारतीय संविधान दिन अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था, संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशन, संविधान फाऊंडेशनच्या वतीने आयोजित संविधान सन्मान दौड २०२५ या मिनी मॅरेथॉनमध्ये ८ हजार पुणेकरांसह ४० देशांतील विद्यार्थ्यांनी सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पुणे विद्यापीठाच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुल येथे स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, मुख्य आयोजक परशुराम वाडेकर, डॉ. विजय खरे, शैलेश भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्यांना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी आमदार सिद्धार्थ शिरोळे, रिपाइंचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, रजिस्टार ज्योती भाकरे, बार्टीच्या निबंधक इंदिरा अस्वार, पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, मॅरेथॉन संघटनेचे ॲड. अभय छाजेड, राहुल डंबाळे, दीपक म्हस्के, श्याम गायकवाड, संतोष मदने आदी मान्यवर उपस्थित होते.

विजेते दहा किलोमीटर (पुरुष) प्रथम- अंकुश हक्के, द्वितीय तुषार बिन्नर, तृतीय- नीलेश आरसीकर, दहा किलोमीटर (महिला) प्रथम साक्षी जाड्याळ, द्वितीय- यामिनी ठाकरे, तृतीय- शीतल तांबे, पाच किलोमीटर (पुरुष) प्रथम- हर्षद कदम, द्वितीय- अनुपमसिंग सिन्हा, तृतीय- गणेश डोंगरे, पाच किलोमीटर (महिला)- प्रथम- राणी मुचंडी, द्वितीय -साक्षी बोराडे, तृतीय - प्रियंका ओकसा, तीन किलोमीटर (पुरुष)- प्रथम -अजय सिंग, द्वितीय अभिषेक गुळविले, तृतीय- आदिनाथ साळुंखे, तीन किलोमीटर (महिला) प्रथम- अनुष्का शिंदे, द्वितीय- आदिती हरगुडे, तृतीय- आदिती तांबे, दिव्यांग व्हीलचेअर- प्रथम- मोहम्मद आलम, द्वितीय- अनिल कच्ची, तृतीय- सुरेश कुमार करकी, चतुर्थ- वाय. निर्जलिंगे.











भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव तसेच प्रजासत्ताक दिनी निमित्त बार्टी संस्थेत संस्थेचे महासंचालक श्री. सुनिल वारे यांच्या हस्ते ध्वजवंदन करून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले..तसेच संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले..
यावेळी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दैनिक लोकटाइम्स

## दिनांक २८-१-२०२५





डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथील मुख्यालयात भारतीय प्रजासत्ताकाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त बार्टीचे महासंचालक श्री सुनिल वारे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. मा महासंचालक श्री वारे यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा व्यक्त केल्या.विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार,  श्रीमती वृषाली शिंदे, श्री दादासाहेब गिते, उमेश सोनवणे, शुभांगी पाटिल यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते..













२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त तसेच भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव (७५वर्षे) हा कार्यक्रम मा. डॉ. हर्षदीप कांबळे- प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात  राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व संविधान उद्देशिका वाचनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री.  मधुकर गायकवाड, माजी आयुक्त समाजकल्याण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी  मा. डॉ. नरेंद्र जाधव, माजी कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व ज्येष्ठ अर्थतज्ञ  यांनी "संविधानाचे वैशिष्ट्ये  व संविधानांतील  डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर मार्गदर्शन केले. शाहिर संदेश विठ्ठल उमाप यांनी "जागर संविधानाचा" हा प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केला यावेळेस मोठ्या संख्येने शालेय व स्पर्धापरीक्षेचे विद्यार्थी, नागरिक व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. तसेच हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता बार्टी संस्थेचे महासंचालक श्री. सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला

























भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव (७५वर्षे ) निमित्त बार्टी संस्थेच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिर येथे संविधान सभेतील डॉ. बाबासाहेबांचे दुर्मिळ छायाचित्र ,उपास्थींना उद्देशिका व पिन बेच वाटप , संविधान दिंडी , रांगोळी द्वारे भारतीय संविधान या दिवसाचे महत्व विशद करण्यात आले. तसेच सर्व उपस्थितांना अल्पोपहाराचे नियोजन करण्यात आले. विविध फ्लेक्स, कमान, विविध सोशिअल मीडिया यांच्याद्वारे कार्यक्रमाचे या सर्व बाबींच्या अनुषंगाने संविधान दिवसाचे महत्व लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य बार्टी मार्फत करण्यात आले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com


# जगाला मार्गदर्शन करणारे भारताचे संविधान

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांचे मत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या तब्येतीची काळजी न करता मोठ्या कष्टाने भारताचे संविधान लिहिले. जगातील अनेक देशांच्या राज्यघटना बदलण्यात आल्या. परंतु, भारताच्या संविधानाने ७५ वर्षांत १४० कोटी जनतेला एकत्रितपणे बांधून ठेवले, याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेचे आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आयोजित भारतीय संविधानाचा ७६वा वर्धापन दिन बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आला होता. 'भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' या विषयावर डॉ. नरेंद्र जाधव यांनी मौलिक विचार व्यक्त केले. सुनील वारे यांच्या नेतृत्वाखाली बार्टी चांगले काम करत असल्याचे सांगून त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजकल्याणचे माजी आयुक्त मधुकर गायकवाड होते. बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, विभागप्रमुख स्नेहल भोसले, निबंधक इंदिरा अस्वार आदी उपस्थित होते.

महासंचालक वारे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. आपण डॉ. बाबासाहेबांच्या मार्गाने जात असून, बार्टीच्या वतीने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व संशोधन क्षेत्रात शिष्यवृत्ती दिला जात आहे. बार्टीतील यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थी प्रियंका मोहिते, व्यंकट गायकवाड, अजय इटकर यांचा सन्मान डॉ. जाधव व वारे यांच्या हस्ते करण्यात आला. शाहीर संदेश विठ्ठल उमाप यांनी 'जागर संविधानाचा' हा प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केला.

या कार्यक्रमाला शालेय, स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, बार्टीतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक विभागप्रमुख स्नेहल भोसले यांनी केले. सूत्रसंचालन प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी केले. आभार निबंधक इंदिरा अस्वार यांनी मानले.


Pune Edition

Jan 28, 2025 Page No. 05

Powered by: erelego.com


लोकनायक -२८-१-२०२५

# भारताचे संविधान संपूर्ण जगाला मार्गदर्शन करणारे

## पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू अर्थतज्ञ डॉ नरेंद्र जाधव यांचे प्रतिपादन

**पुणे| प्रतिनिधी**

भारतीय संविधानाने या देशातील जनतेला स्वातंत्र्य समता बंधुभाव न्याय मिळवून दिला. संविधान हे सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष व लोकशाही गणराज्य असून सर्वांना न्याय व दर्जाची समान संधी उपलब्ध करून देते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या तब्येतीची काळजी न करता मोठ्या कष्टाने भारताचे संविधान लिहिले. जगातील अनेक देशाच्या राज्यघटना बदलण्यात आल्या परंतु भारताच्या संविधानाने ७५ वर्षात १४० कोटी जनतेला एकत्रितपणे बांधून ठेवले याचे सर्व श्रेय डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेचे आहे. भारताचे संविधान हे जगातील सर्व देशाला दिशादर्शक व मार्गदर्शन करणारे असल्याचे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू अर्थतज्ञ डॉ नरेंद्र जाधव यांनी बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आयोजित भारतीय संविधानाचा ७६ वा वर्धापन दिन सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी बालगंधर्व,रंगमंदिर पुणे येथे आयोजित करण्यात आला.

भारतीय संविधानाची वैशिष्टये आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान या विषयावर डॉ नरेंद्र जाधव यांनी आपले मौलिक विचार व्यक्त केले. तसेच त्यांनी संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान याविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. बार्टीचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या नेतृत्वाखाली बार्टी चांगले काम करत असल्याचे सांगून मा महासंचालक यांचे अभिनंदन केले. अध्यक्षस्थानी समाजकल्याणचे माजी आयुक्त श्री मधुकर गायकवाड हे होते.

बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, आदी उपस्थित होते. मनोगत व्यक्त करतांना मा महासंचालक श्री वारे म्हणाले की राज्याचे सामाजिक न्यायमंत्री मा श्री संजय शिरसाट, राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ, सचिव डॉ हर्षदिप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली.आपण डॉ बाबासाहेबांच्या मार्गाने जात असून बार्टीच्या वतीने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व संशोधन क्षेत्रात शिष्यवृत्ती दिला जात असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बार्टी कटिबद्ध असून तुमचे यश हे समाजाचे, बार्टीचे, संविधानाचे असल्याचे मत व्यक्त करून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. बार्टीतील यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थी प्रियंका मोहिते( IPS) व्यंकट गायकवाड (CAPF ) अजय इटकर (CAPF) यांचा सन्मान डॉ जाधव , श्री वारे यांच्या हस्ते करण्यात आला. शाहिर संदेश विठ्ठल उमाप यांनी जागर संविधानाचा हा प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाला शालेय, स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थी, विविध क्षेत्रातील मान्यवर बार्टीतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले यांनी केले. सुत्रसंचलन प्रकल्प व्यवस्थापक श्री सुमेध थोरात यांनी केले. आभार निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांनी मानले.. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी व प्रकाशन व प्रसिद्धी विभागाने मेहनत घेतली.




**भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव (७५वर्षे ) निमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली समता दूत विभागाच्या वतीने संपूर्ण राज्यामध्ये विविध कार्यक्रमाद्वारे साजरा करण्यात आला त्याची छायाचित्रे.**







भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास बार्टी संस्थेचे महासंचालक
श्री. सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

# धन्यवाद